काव्य
२५३८



# लकेर

मनोहर रणपिसे

REFBK-0024907

२५३८
२४००८
१८।४।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३२
ग्रं. क्र. २४००८
काव्य
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# लकेर

# लकेर

(काव्यसंग्रह)

मनोहर रणपिसे

REFBK-0024907
REFBK-0024907

आरती
प्रकाशन

प्रकाशिका
सौ. अनघा देशपांडे
आरती प्रकाशन
१२। बी आसावरी
विष्णुनगर डोंबिवली (प.)

मुद्रक
दिनेश शंकर चंदेल
चंदेल प्रिंटिंग प्रेस
१४८२ शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

प्रथमावृत्ती : ऑक्टोबर ८५

© सौ. रंजना रणपिसे
३०१–सी, लवकुश अपार्टमेंट
सेवाराम देवनमल मार्ग
सिंधी सोसायटी, चेंबूर
मुंबई क्र. ४०००७१

मूल्य : रु. १५

मुखपृष्ठ : प्रमोद पवार

या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

माझ्या घरात फुललेली
तीन
सदासतेज, मोहक काव्यसुमने
मनिषा
किरण
रागिणी
यांस–

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५३२
दा. क्र. ८८०५
काव्य २८।७।८६
ग्रंथ शाळा

## मनोगत

मला फुलांचा मोह वाटतो. मला निसर्गाची ओढ वाटते. क्षितीजाचे विविध-रंग माझ्या मनाला भुरळ पाडतात. हिरवीगार कुरणे, संथ वाहणाऱ्या नद्या, बागडणारे ओढेनाले; पावसाच्या सरी, धुक्याच्या लाटा, डोंगरांची शिखरं मला आपल्याकडे बोलावतात. पक्ष्यांची किलबिल, प्राण्यांचं उन्मुक्त जीवन, पिकांची सळसळ मला बेभान करते. पहाटेचं कोवळेपण, दुपारचं जळतं उन्ह, तिन्हीसांजेची धूसरता, रात्रीचा मिट्ट काळोख, पौर्णिमेचं पारदर्शी चांदणं माझ्या जीवनात आनंद निर्माण करतात. गाईचं हंबरणं, कोंबडयाची बांग, चिमणीची चिवचिव, कोकीळेचं गान नेहमीच माझ्या मनाला पुलकित करतात. मला घनदाट जंगलं आवडतात, वैराण वाळवंट आवडतं, उत्तुंग पर्वत, खोलखोल दऱ्या आणि सपाट माळरानही आवडतं. निसर्गाच्या सान्निध्यात माझ्या चित्तवृत्ती बहरून येतात–

– अनवाणी पायांनी, अनोळखी पाऊलवाटा तुडवीत मी डोंगरदऱ्यात मन-मुराद भटकतो, नि दमूनभागून झाडाच्या सावलीत विसावतो.

अशावेळी कोठूनतरी निरव शांततेवर तरंग निर्मित कुण्या अदृश्य पाखरांची प्रणयोत्सुक लकेर घुमते. ती लकेर जणू मला साद घालते आहे असा मला भास होतो. तिचा मागोवा घेत मी उठून चालू लागतो–

– त्या लकेरीचा मागोवा घेताघेता केलेल्या वाटचालीत हाती आलेली ही काव्यसुमने–

**– कवी**

## अनुक्रमणिका


निसर्ग / ९
आभाळाची पाटी / १०
वळवाची सर / ११
सूर्य / १२
श्रावण आला / १४
पाऊलवाट / १५
करवंदाची जाळी / १६
झोपडी / १७
आला मृगाचा पाऊस / १९
चमचम काजवे चमचमती / २०
धरणी माते / २१
निळाई / २३
वादळ / २४
चांदणी रात्र / २६
डोह / २७
सागरसंध्या / २९
जीव माझा गुंतला / ३०
ऊनसावली / ३१
लकेर / ३२
वारा / ३३
दिव्यांचे बेट / ३४
भाताची शेते / ३६
माळ / ३७
मेघ अंबरी / ३९
अमावस्या / ४०
खडक / ४२
चांदणी निशा / ४४
पृथ्वीची उचकी / ४५
सागर / ४६
सिमेंटच्या जंगलात / ४७
रात्र अंधारुन आली / ४९
दरी / ५०
उद्यान / ५२
आटलेली नदी / ५४
पर्वत / ५५
धुकं / ५६
विशाल सागरतीरावर / ५७
बाभुळबन / ५८
अंकुर / ६०

## निसर्ग !

हिरव्य-हिरव्या तृणपात्यांवर, थरथरती डुलती दंवबिंदू
सोनेरी किरणांत चमकती, मोत्यांचा जणू बनला सिंधू

नाजूकरेषा रांगोळीच्या, नागमोडी ह्या पाऊलवाटा
उगम न त्यांना, अंत न त्यांना, भ्रांतचित्त त्या करिती पथिका

मधुन वाहतो प्रेमळ निर्झर, फुलवित जातो तृणांत सुमने
झुळझुळ मंजुळ सुरात गातो, जीवनसंगीत लोभसवाणे

किल्बिल चाले वृक्ष लतांवर, झुडपांत कुठे लकेर सुस्वर
शहारली काया सृष्टीची, विसावल्या सावल्या दूरवर

किती रम्य ही सृष्टी अहाहा, जे दिसते ते मोहवी अंतर
मला वाटते धुके होऊनी, कुरवाळावे सर्व चराचर

## आभाळाची पाटी !

आभाळाची पाटी
कोरी कधीच नसते
काहीबाही तिच्यावर
लिहिलेलेच असते !
कधी चांदण्यांची उजळणी
नक्षत्रांची भूमिती
तर कधी–
आकाशगंगेचा–
शुद्धलेखनाचा परिच्छेद !
कधी ढगांची चित्रकला
कधी किरणांची रांगोळी
कधी कधी–
ग्रहणाचं मॉडर्न आर्टदेखील !
चंद्रकोरीची वेलांटी
सुर्याचा पुर्णविराम
कधी धूमकेतूचा स्वल्पविराम
तर कधी–
उल्केचा ओरखाडादेखील !

आभाळाच्या पाटीवरची
लिपी आहे अगम्य !
वाचता काही येत नाही
अर्थ काही लागत नाही
ज्यांना तिचा उलगडा झाला
त्यांना साक्षात्कार झाला–
विश्वाच्या रहस्याचा !
बाकी आम्ही सारे
अर्थ लावतो मनासारखे
आणि–
धडे गिरवतो चुकीचे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ..........
शाखा स्थळ प्रत

## वळवाची सर !

भुरके करडे गडगडणारे
मेघ चालले गगनपथी
वाऱ्यावरती स्वार होऊनी
इकडून तिकडे मंदगती–१

कडकड कडकड वीज कडाडे
वृक्ष लताही थरथरती
सुसाट धावे वादळवारा
गर, गर, गर पाने फिरती–२

तडतड तडतड पडती गारा
अंगणांत, कौलांवरती
सर सर सर सर थेंब टपोरे
आभाळामधूनी झरती–३

धूसर भेसूर धुके दाटले
उजाडल्या माळावरती
लोट धुळीचे विशाल उठती
क्षितिजाला भिडण्यासाठी–४

अशी अचानक वळवाची सर
कोसळून निमिषात तशी–
पाहता पाहता निघून जाई
जलमय करुनिया सृष्टी–५

टपटप टपटप थेंब टपोरे
पानांमधुनी पाझरती
बावरलेली गुरे वासरे
झाडांखाली कुडकुडती –६

मेघांच्या काफिल्यामागुनी
हळूच रवीकिरणे येती
इंद्रधनूचे दर्शन होई
निळ्या डोंगराच्या पाठी –७

## सूर्य !

माझ्या घरासमोरच्या डोंगराआडून
रोज सकाळी
प्रकाश घेऊन वर येतो
एक लाल तेजोगोल !
त्याचं ते तेजःपुंज रूप
मुखावरचं स्मितहास्य
आणि–
सोनेरी किरणांचे सहस्र हात
तेव्हा तो मला माझा मित्र वाटतो !
त्याला साक्षी ठेवून
नव्हे, त्याच्या साहाय्यानेच
उरकतो मी माझी कामे
माझी दिनचर्या सुरू असते
त्याचा प्रवास चालू असतो !
दुपारी त्याच्याकडे पाहवत नाही
आभाळातून नुसता आग ओकतो
त्याच्या सामर्थ्याने मी दिपून जातो
तेव्हा तो मला माझा गुरू वाटतो !
सायंकाळी तो शांत होतो
जणू लोण्याचा गोळा
आपल्या सहस्र हातांनी तो मला अशीर्वाद देतो

तेव्हा तो मला माझा भाग्यविधाता वाटतो !
तो असा रोज येतो
आणि रोज जातो
मी त्याची रोज वाट पाहतो
रोज स्वागत करतो
रोज निरोप घेतो !

## श्रावण आला...!

श्रावण आला, आभाळ भरले, निळया निळया मेघांनी
शुभ्र झऱ्यांच्या रेशिमधारा झरती शिखरांवरुनी.

गर्द तरुंच्या निळया सावल्या, पांघरल्या कुरणांनी
पिवळे पिवळे, ऊन कोवळे, चमके पानोपानी.

निर्झर खळखळते बागडती, हिरव्या ओल्या रानी
मेघांचे काफिले सरकती, डोंगरमाथ्यावरुनी.

पठारावरी गाईवासरे, चरती निवांतवाणी
बालगुराखी गीत रांगडे, घुमवी पाव्यामधुनी.

शेतांमधली पिके डोलती, पक्षी गाती गाणी
श्रावण आला, श्रावण आला, नवजीवन घेऊनी.

## पाऊलवाट !

नदीकाठी असते, माळावर असते
डोंगरावर असते, पायथ्याशी असते
गावात असते, शिवेत असते
जंगलात असते, पठारावर असते
ही पाऊलवाट कुठून येते !

पावलापावलाने पुढे चालते
पावलापावलाने उमटत जाते
पावलापावलावर वळत जाते
कधी संथ कधी पळत जाते
ही पाऊलवाट कुठे जाते !

तिला काट्याचे भय नसते
तिला आगीचे भय नसते
तिला पावसाचे भय नसते
तिला वाऱ्याचे भय नसते
पाऊलवाट एवढी धीट कशी असते !

गावाला गाव जोडीत जाते
नदीशी जोडते, डोंगराचे नाते
मनाला मन जोडीत जाते
साऱ्यांशी तिचे मैत्रीचे नाते
पाऊलवाट संपूच नये असे वाटते !

## करवंदाची जाळी !

ओढ्याच्या काठावरी
एक करवंदाची जाळी
जाळीवर गच्च लहडली
करवंदं काळी काळी.

रसरशीत ताजे ताजे
झुपके काळ्या मोत्यांचे
काळ्या पापुद्र्याखाली
गर आंबटगोड चवीचे.

टवटवीत हिरव्या हिरव्या
पानांची झाली दाटी
काट्यांच्या आडून बघती
करवंदं मोठी मोठी.

जाळीच्या बुंध्यापाशी
मुंग्यांनी वारुळ केले
लाल लाल मुंगळे मोठे
करवंदे चाखित बसले.

पाखरे अचानक येती
चोचीत घेऊन जाती
जंगलचा न्यारा मेवा
जंगलवासींच्या साठी.

## झोपडी !

निर्जन, आडरानात...
डोंगराच्या कुशीत...
नदीच्या काठी...
आहे एक झोपडी !
एकाकी, एकटी !
वेडयावाकडया मेढी
त्यावर केंबळाचे छप्पर
अर्धवट उडालेले !
कुडाचा दरवाजा
कुडाच्याच भिंती
त्याही जीर्ण झालेल्या !
अशी ही झोपडी
काठी टेकून...
उन्हाला पाठ देऊन...
डोक्यावरच्या बटा विस्कटून बसलेल्या
जख्ख्ड म्हातारीसारखी !
आजूबाजूला माजलेलं गवत
एक पाऊलवाट आलेली--
डोंगरावरून पळत पळत !
झोपडीला कशाचंच भान नाही
नदीच्या पाण्यातलं

आपलं प्रतिबिंब पाहात राही
खिन्नपणे !
आठवत असतील तिला
मागचे दिवस...
वाऱ्याला न जुमानणारे
पावसाला अंगावर खेळवणारे !
आता मोजतेय शेवटच्या घटका
लावून गेल्यात त्या
जिवाला चटका !
आता फक्त–
वाऱ्याचा एक जोरदार झटका
आणि–
उडून जाईल शरीराबरोबर
गळ्यात दाटलेला हुंदका !

# आला मृगाचा पाऊस !

आला मृगाचा पाऊस, वारा वादळ घेऊन
भर दुपारच्या वेळी आणि आले अंधारून.

हंबरती गुरेढोरे, झाडे पाने थरथरती
सैरभैर वावटळ, पोरं त्यातून पळती
पडे टप् टप् गारा, गेले भरून अंगण.

गारा पावसाच्या धारा, पत्र्यावरी तडतडती
काळ्या ढगांच्या मिठीत, कशा विजा कडकडती
पक्षी उभे निवाऱ्याला, चोच चोचीत घालून.

कुंद झाल्या दाहीदिशा, पावसाच्या सरी येती
आला मातीला सुगंध, आता फुलेल धरती
तिची तापलेली काया, येईल हो मोहरून.

## चमचम काजवे चमकती !

काळया काळया अंधारात मिणमिणती
चम्, चम्, काजवे चमचमती
एक, दोन, तीन, चार, मोजू किती
एकामागोमाग एक येती जाती.

बकुळीच्या झाडावर, फांदीवर, पानांवर
इवले, इवले काजवे लुकलुकती
किर्र, किर्र, चुर्र, चुर्र, गुण्, गुण्, सुन्, सुन्
त्यांच्यासवे रातकीडे गाणे म्हणती.

झुळझुळ, वारा वाही, फांदीवर झोके घेई
झोक्यांसवे काजव्यांचे थवे डोलती
लख्ख्कन् लकाकून, गप्प्कन् अंधारून
लपालपी, छपाछपी कसे खेळती.

अंधारात ऊन पडे, माझ्या मना भूल पडे
काजवे हे अचानक कुठून येती
अंधाराच्या भाळावर, पानांवर, फुलांवर
ऊधळूनी दिल्या कुणी, दीपज्योती

ग्रंथ संग्रहालय ठाणे

## धरणी माते !

धरणी माते
तुझ्या उदरात लपली आहेत
युगायुगांची गुपिते !
पृथ्वीच्या उत्पत्तीपासून
पाहिलीस अनेक स्थित्यंतरे
मानवाची !
माणसाची बुद्धिमत्ता, शौर्य, क्रौर्य...
त्याची उत्क्रांती, क्रांती... उत्कर्ष अधोगती...
साऱ्यांच्या खुणा
दबून गेल्या आहेत तुझ्या गर्भात !
ऋषी–मुनी, राजा–प्रजा
क्रुरात्मे... महात्मे
अखेर सारे विसावले तुझ्याच कुशीत !
तू आम्हाला उदार हस्ते सारं दिलंस...
धन-धान्य, फळे-फुले, निवारा... पाणी
आमचे जीवन समृद्ध झाले, सुखी झाले
ते केवळ तुझ्यामुळेच !
माते !
आम्हाला विस्मरण झाले
तुझ्या दातृत्वाचे

आम्ही झालो उन्मत्त
विसरलो तुझी प्रेमाची शिकवण
त्यागाचा संदेश !
आम्ही शत्रू झालो आमचेच
आणि पाट वाहविले रक्ताचे !
अणुबॉम्ब हायड्रोजनबॉम्बच्या वाती
वाट पाहताहेत अखेरच्या घटकेची !
ती घटका येईलच कधीकाळी
आम्हीच ठरणार आहोत आमचे बळी !
एक दिवस असा येईल
मानवजात नष्ट होईल
पण, धरणी माते !
तदनंतरही तू असशील
तू असशील–
पुन्हा नव्याने सृजनाचे बीज फुलविण्यासाठी !

## निळाई !

निळ्या निळ्या आभाळाची, मला ओढ अनावर
विद्युल्लता होऊनिया, चमकावे क्षणभर.

दिपवावे एकदाच, असे डोळे अनेकांचे
जिवा चटका लावुनी, नष्ट व्हावे कायमचे.

निळ्या निळ्या जलामधे, मीन होऊनी रहावे
पाताळाचे पारदर्शी, जग हिंडून पहावे.

निळाईचे वेड माझे, निळे दिसता त्यात बुडे
तिच्या निळ्या डोळ्यांमधे, मला सर्वस्व सापडे.

## वादळ !

मातकट रंगाचे मस्तवाल ढग
आभाळात रस्ते अडवून उभे होते
सुर्याची किरणे...
भर दुपारीही...
झरोक्यांतून चोरटेपणे...
डोकावत होती...गायब होत होती !
विचित्र शांतता–
अस्वस्थ करणारी–
जणू आभाळात इमर्जन्सी डिक्लेअर झाली होती !
दूरवर...आभाळाच्या कोपऱ्यात
थोडीशी गडबड झाली
एका ढगाचा धक्का दुसऱ्याला...
...त्याचा तिसऱ्याला...
पाहता पाहता आभाळात–
ढगांची दंगल सुरू झाली !
ढग सैरावैरा पळू लागले
लाठीमार झालेल्या मोर्चामधील पब्लिकसारखे !
गड्, गड्, गड्, बंदूकीच्या फैरी झडल्या
कड्, कड्, कड्, अश्रूधुरांची नळकांडी फुटली
ढगांची बायकापोरं किंचाळू लागली

भयंकर कोलाहल माजला !
मोर्चावर चाललेला गोळीबार पाहून–
जशी चाळीतली माणसे घाबरतात
तशी–
जमिनीवरील झाडे, पाने
भितीने थरथरू लागली !
वाऱ्याने घातला धिंगाणा
पक्षी, प्राणी, माणसे
साऱ्यांचीच झाली पळापळ
मोठी माणसं पोरांना म्हणू लागली–
अरे, घरात पळा
आलंय मोठ्ठं वादळ !

## चांदणी रात !

टिपूर चांदणी रात
नील नभातून, निळे चांदणे
निथळे चराचरात.

लोभसवाणी रात्रदेखणी
धूसर धूसर धूंद यामिनी
स्वप्नमयी समयाला आले
चंद्रबिंब बहरात.

निळया नदीचा ओघ थबकला
पहाड काळा शांत झोपला
अगणित तारे लुकलुक करीती
विशाल आसमंतात.

झाडे पाने शांत झोपली
मुळी न येई चाहुल कुठली
परंतु लावी हुरहुर कसली
मनास हा एकांत.

जग सारे नि:स्तब्ध जाहले
मौन इथे मोहरून आले
रोमांचांच्या कळया सुगंधी
फुलल्या या विजनात.

## डोह !

झाडाच्या गर्द सावलीत
नदीच्या दोन्ही काठांशी करीत हितगुज
प्रणयी जनांची ऐकत कुजबुज
मी आपला स्वस्थ पडलो आहे
अनेकवर्षे !
सकाळी पक्ष्यांची किलबिल ऐकतो
दुपारी पानांची मंद सळसळ कानी येते
सायंकाळी मंदिरातून घंटानाद ऐकू येतात
रात्रीचे भेसूर आवाज ऐकवत नाहीत.
मी जागाच असतो
दिवसरात्र जागाच !
माणसं मला घाबरतात
इथं भुताटकी आहे म्हणतात !
चुकूनमाकून येतं
एखादं उनाड ढोर
भोवतालच्या शांततेला घाबरून
पळत सुटतं चारी खुरांवर !
माझं आयुष्य व्यर्थ आहे
आता वयाचा हिशोब सोडून दिलाय
अंगावर सुरकुत्यांचं शेवाळं माजलंय
सर्वांगाचा नुसता गाळ झालाय

हा हरघडी साचणारा गाळ
एक दिवस
संपविल माझं अस्तित्व !
येणारे जाणारे म्हणत राहतील
इथं होता एक
भुताटकीचा डोह !

## सागरसंध्या !

उदासवाण्या सागरतीरी, संथ वाहती लाटा
दूर निळ्या क्षितिजाच्या काठी, धूसर झाल्या वाटा.

ताडांच्या झावळ्या सावळ्या, मंद मंद डोलती
आभाळाच्या कुशी विहरतो, पक्षी कुणी एकटा.

शुभ्र शिडांच्या अनेक नौका, दूर कुठे चालल्या
शोध कुणाचा घेण्या जाती, मावळतीला आता.

अशा अवेळी कातरवेळी, कोण भैरवी गाई
सूर कुणाचा, गीत कुणाचे, व्यथा कुणाच्या चित्ता.

## जीव माझा गुंतला !

हिरव्या रानात, ओल्या पानांत, जीव माझा गुंतला
ओल्या मातीत, पाय वांटेत, जीव माझा गुंतला.

निळ्या-काळ्या डोंगरांचे पंख ओलेचिंब
काळ्या ढगांतूनी पाणी पडे थेंब थेंब
गार वाऱ्यात, दऱ्या-खोऱ्यांत, जीव माझा गुंतला.

ओल्या ओल्या गवतावरी अनवाणी पाय
पायाखाली पसरली जशी मऊ साय
माळरानात, काट्याकुट्यात, जीव माझा गुंतला.

खेकडा खुशीत मोठ्या, चाले तुरुतुरु
खार उंबराची फळे खाई कुरुकुरु
उभ्या पिकात, रानावनात, जीव माझा गुंतला.

गाईच्या गळ्यात घंटी वाजे खुळखुळ
गोठ्यामधे वासराची चाले चुळबुळ
गळक्या घरात, गुराढोरांत, जीव माझा गुंतला.

## ऊन-सावली !

ऊन आणि सावलीचा
खेळ चालला होता पाठ-शिवणीचा
पुढे पुढे ऊन
मागे मागे सावली
कधी शेतावरून धावली
कधी डोंगरावरून धावली
ऊन भारीच चपळ
क्षणात इथे, क्षणात तिथे
सावलीची होई धावपळ
तिनं धावायचं तरी कुठे कुठे ?
जरा कुठे पठारावर थांबावे
तर ऊन जवळच्या शेतात दिसायचे
तिथं जावं तर ते–
आमराईत जाऊन लपायचे
पाठशिवणीच्या खेळात
सावली अखेर दमून गेली
डोंगराच्या कडेकडेने
क्षितीजापार पळून गेली !

## लकेर !

हिरवे हिरवे गवत त्यामधे
निळी-जांभळी ही रानफुले
रानफुलांवर तृणपात्यांवर
दवबिंदूंचे थेंब सावळे.

दरीकपारीवरी वर्षती
रिमझिम रिमझिम रेशिमधारा
उघड्या माळावरी झोंबतो
भिरभिरणारा खट्याळ वारा.

झुडपांच्या घरट्यांत झोपली
चिवचिवणारी चिमणी तोंडे
झाडांच्या शिखरांनी ल्याले
शुभ्र धुक्याचे मऊमऊ गोंडे.

काळ्या खडकांच्या पाठींवर
निर्झर खळखळती बागडती
तरु-वेलींच्या तळी येऊनी
गोजिरवाण्या गिरक्या घेती.

डोंगरमाथ्यावरी अचानक
कधी उतरते ऊन रुपेरी
फडफडणाऱ्या पंखांमधुनी
–आणि उमटती गोड लकेरी.

## वारा !

सकाळचा कोवळा वारा
बालपणासारखा
कुठेही भिरभिरणारा
थोडा अल्लड, थोडा अवखळ
तरीही प्रसन्न करणारा
खळणाऱ्या झऱ्यासारखा !

दुपारचा दमदार वारा
तारुण्यात पदार्पण केलेला
किंचित दाहक
थोडा संयमी, थोडा अधीर
प्रेयसीची प्रतिक्षा करणाऱ्या
भाबड्या प्रियकरासारखा !

तिन्हीसांजेचा विरक्त वारा
थकला-भागलेला
पण हुरहूर लावणारा
थोडा उदास, थोडा गंभीर
तरीही बेचैन करणारा
मावळणाऱ्या सूर्यासारखा

रात्रीचा मिलनोत्सुक वारा
अंगावर शिरशिरी आणणारा
रोमांच फुलवणारा
थोडा रगेल, थोडा रंगेल
उद्याची स्वप्ने दाखविणारा
पौर्णिमेच्या चंद्रासारखा !

## दिव्यांचे बेट !

रात्रीची वेळ होती...
आगगाडी चालली होती...
खंडाळ्याच्या घाटातून,
भल्या मोठ्या बोगद्यातून !
बाहेर गडद काळोख होता
कोळशासारखा काळा
अचानक...
त्या अंधाराचे फाडून पोट
वर आले एक दिव्यांचे बेट !
शेकडो दिवे,...हजारो दिवे
जणु झाडावर बसलेले अनेक काजवे !
छे ! छे !
जणू आभाळातल्या चांदण्या
खाली उतरून–
घोळका करून बसल्यात
हळदीकुंकवासाठी !
गाडीमधली चिल्लीपिल्ली
बाया-बाप्ये, तरणी पोरे, म्हातारे-कोतारे...
सारीच खिडक्यांजवळ आली
ओहो ! अहाहा ! ! कित्ती ऽ छान ! ! !
ब्यूटीफुल !, मार्व्हलस् !

इन्शाल्ला, क्या नजारा है !
सारेच प्रवासी हरवून गेले
दिव्यांच्या तेजाने दिपून गेले !
दिव्यांची बेटं मायावी असतात
जवळ गेल्यावर ती तिथं नसतात !
दिव्यांची बेटं दुरून दिसतात देखणी
मनातला अंधार दूर करायला
क्षणभर घ्यावी उसनी !

## भाताची शेते !

पिवळी भाताची शेते
वाऱ्याच्या तालावर करती
डौलाने समूहनृत्ये.

लोंब्या लवल्या भाराने
पात्यांशी गुजगोष्टी करती
सळसळ अस्फुट नादाने.

गंध पिकाचा दरवळतो
धुंद होऊनी त्या गंधाने
तिथेच वारा घुटमळतो.

पिवळी भाताची शेते
जमिनीतून उगवले सोने
कांचन झाले घामाचे.

## माळ !

विस्तीर्ण माळ
सुस्त पडला आहे
आकाशासारखा !
तसा तो नेहमीच असतो म्हणा !
उन्हाळा असो...पावसाळा असो...
अथवा हिवाळा असो
हा आपला ढिम्म् !
नाही म्हणायला–
पावसाळ्यात थोडं गवत उगवतं
तेही खुरटं !
हिवाळा येता येताच ते नाहीसं होतं !
उन्हाळ्यात तर चक्क बोडका होतो
तुळतुळीत !
एवढ्या मोठ्या माळावर
एकही झाड नाही
एका कोपऱ्यात उभा आहे
चार झुडूपांचा पुंजका
तोही काटेरी !
बाजूला एक दगडांचा ढीग
काही खेकड्यांची बिळं आहेत
रात्री कोल्हे येतात

आणि भयाण ओरडतात
एकेकाचं नशीब तरी काय असतं !
विटलेल्या चिरगुटासारखं
कळाहीन !
पण माळाला त्याचं काही नाही
सुख नाही, दु:ख नाही
आशा नाही म्हणून निराशाही नाही !
आभाळाकडे टक लावून
निश्चेष्ट पडलाय
कलेवरासारखा !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## मेघ अंबरी !

दाटूनी आले क्षणात मेघ अंबरी
कोठुनीतरी.

दामिनी चमचम चमके, घन भरून आले
कडकड, गडगड, गर्जन नर्तन हे चाले
वादळ वारे सुसाट श्वापदापरी.

कोकिळ कुहू कुहू बोले, मयुर मुदित झाले
थुई, थुई वर्षावाने विजन तृप्त झाले
मातीच्या गंधाने धुंद धरीत्री.

सरसर, झरझर, अंबर पुन्हा लख्ख झाले
तप्त–तृषित धरतीला, जल देऊनी गेले
निळे विश्व अवतरले, निळ्या डोंगरी.

## आमावस्या

अमावस्येच्या काळ्या रात्री
साम्राज्य अंधाराचे
घुबडाचे भेसूर धुत्कार
आणि,...मधुनच...
कर्णकटू किरकिरणे रातकिड्यांचे !
डोंगर जणू आक्राळविक्राळ दैत्य
झाडांचे आकार भुतांसारखे
वाटतं, काही हालचाल करू नये
गप्प रहावे...दगडासारखे !
दूर माळावर
भेसूर कोल्हेकुई ऐकू येते
आणि मग कुत्र्यांचे भुंकणे...
ऐकवत नाही ते !
कानात घट्ट बोटं दाबूनही
हृदयाची धडधड ऐकू येते !
जरा वेळाने सारं शांत होते
मग कठेतरी खुसफुस ऐकू येते
दिसत काहीच नाही...
जीव गुदमरतो...
उगाच मोठ्याने ओरडावेसे वाटते !
शेतावरच्या पडाळीवर

कुणा म्हाताऱ्याला खोकल्याची उबळ येते
तेवढाच जरा आधार वाटतो
जरा हायसे वाटते
पुन्हा सारं शांत होते
डोळ्यांवर झोपेची झापड येते !
अचानक–
एक टिटवी–
टि टी ऽ व टिव्, टि टी ऽ व टिव्... चित्कारत जाते
काळजाचे पाणी पाणी होते !
वाटतं...
ही भीती... हा अंधार... कधी संपणारच नाही
अमावस्येचा हा काळोख
सा ऽ रं, सारं ऽ गिळून टाकणार आहे !

## खडक !

एका लहानशा टेकडीवर
उभा होता एक खडक !
काळाभोर, गुळगुळीत, उंच !
ऊन, वारा खायचा
पाऊस अंगावर घ्यायचा
हलायचा नाही, चालायचा नाही
निश्चल उभा असायचा
जणू एखादा तपस्वी !
टेकडीवरच्या हलत्याचालत्या जगात
तसा तो अपेक्षितच होता,
कधीकधी उपहासदेखील व्हायचा !
पाखरं त्याच्यावर विष्टा टाकायची,
माकडं त्याला वेडावून दावायची,
गवताची पाती म्हणायची–
बघ, आमच्यासारखं डोलता येतं का तुला ?
इवलीशी फुलझाडं
फिदीफिदी हसायची,
रंगीबेरंगी फुलांचा दिमाख दाखवायची !
खडक आपला गप्पच !
एक दिवस काय झालं
काही माणसं टेकडीवर आली

खडकाला न्याहाळू लागली
अवतीभोवती फिरली
आणि म्हणाले,– " फारच छान ! "
मग त्यांनी काढली हत्यारं–
छिन्नी, हातोडा... काहीबाही
खडकाच्या कपच्या उडू लागल्या
गवताच्या अंगावर पडू लागल्या
वेलींना, फुलांना चिरडू लागल्या
पाहता पाहता खडकामधून
साकार झाली रेखीव मूर्ती
देवाची !
भोवतालचं जग चकित झालं
खडकाला देवपण आलं !

## चांदणी निशा !

शुभ्र चांदणी निशा
काननी विसावली
स्तब्ध जहाली हवा
स्तब्ध स्तब्ध जाहली.

हे पहाड उंच उंच
ही झाडी गर्द निळी
हे कातळ चकचकती
स्तब्ध थांबल्या जळी

किरकिरती रातकिडे
पक्ष्यांची नीज उडे
या विजनी आज जणू
साजरी दीपावली.

जोत्स्नेशी गूज करीत
मधुर मोहमयी होत
एक एक क्षण सरतो
मंद मंद पावली.

## पृथ्वीची उचकी !

पृथ्वीला लागलीं उचकी
गदगदा हलू लागले
डोंगर, झाडे, पक्षी !
नदी–नाले भयभीत झाले
वाट दिसेल तिकडे पळत सुटले
माणसांच्या घरांवर
मातीचे ढीग बसले
सैरावैरा धावताना
प्राण्यांचे दिशाज्ञान संपले
पक्षी तर बिचारे
जागच्या जागीच थिजून गेले
डोंगरांचे कडे
जमिनीत लपून बसले
जमिनीच्या पोटातून
हुंकारांचे गडगडाट उठले
पृथ्वीचीच उचकी ती
उचकी फार जोराची
पर्वताच्या घशातून वर आली
आकाशात सोडले तिने वाफेचे ढग
आणि–
लाल लाव्हारसानं सारं जाळीत गेली !

## सागर !

तू अथांग आहेस
तू असीम आहेस
अतुलनीय आहेस, अभेद्य आहेस
तू सागर आहेस !
तू सूर्याला गिळून टाकणारा
तू चंद्राकडे झेप घेणारा
तू क्रोधी तसाच उदार आहेस
तू सागर आहेस !
तुझ्या उदरात सामावलंय विश्व
तू जलचरांचा जनिता–त्राता
पृथ्वीचा भाग्यविधाता आहेस
तू सागर आहेस !
तू शांत असतोस तेव्हा तपस्वी वाटतोस
तू उधाणतोस तेव्हा कृतांत वाटतोस
तू म्हणजे अगम्य कोडं आहेस !
तू सागर आहेस !

## सिमेंटच्या जंगलात !

सिमेंटच्या जंगलात
जेव्हा आभाळ भरून येतं
एरवीच्या शांत सागरालाही
तेव्हा उधाण येतं !
आभाळाचा राखाडी रंग
राखाडी समुद्राचं पाणी
प्रकाशही असतो राखाडी !
मळकट काळे डांबरी रस्ते
निपचित पडून असतात
पावसाच्या आंघोळीची वाट पाहात !
वारा उनाडपणे हुंदडत असतो
चाळींतून, झोपड्यांतून
आलीशान इमारतींतून !
उंच उंच स्कायस्क्रॅपर्सचे ताडमाड
आभाळाला डोकी टेकवून
दिमाखात उभे असतात !
चाळीच्या बोरीबाभळींची कौलारू छपरं
रांगेत उभी असतात
पाऊस झेलण्यासाठी !
झोपड्यांच्या झुडपांत मात्र
दंगामस्ती सुरू असते

पावसाला भेटण्यासाठी !
वीज चमकते---
सिमेंटचे जंगल दचकते !
ढग गडगडतात---
सिमेंटचे जंगल हादरते !
पण–
आभाळ भरून आलं की
सिमेंटचे जंगलही
रोमांचित होते !

## रात्र अंधारून आली !

रात्र अंधारून आली
नभी तारकांचे दिवे
झुडपांच्या झोपडयांत
चमकू लागले काजवे.

डोंगराच्या कपारींत
रानसावजे लपली
झाडांवरी घरटयांत
मुकी पाखरे झोपली.

निशादेवीच्या स्वागता
रातकिडे गीत गाती
आणि झऱ्याची सनई
घेई तान भैरवीची.

पेंगुळल्या सृष्टीवर
प्रीत वत्सल निशेने
काळचा शालूचा पदर
पांघरला ममतेने.

## दरी !

विशाल डोंगराचं चिरून पोट
दरीनं केलंय त्यात आपलं घर !
आत शिरायची
कोणाची शामत नाही,
आतल्याला बाहेर यायची
हिम्मत नाही !
काळ्या कातळांच्या निसरड्या भिंती
जागोजागी श्वापदांची वस्ती
झाडांची झालीय नुस्ती दाटी
पाखरांची तर अगणित घरटी
वरती छप्पर आभाळाचं
दरीला मग भय कशाचं !
दार मोकळं पाहून
वारा आत घुसतो
क्षणात घुसमटून–
वाट मिळेल तिकडे पळत सुटतो !
पाऊस धो, धो कोसळतो
दरीच्या पोटात गडप होतो !
उन्हेसुद्धा–
दबकत दबकत आत शिरतात
आतल्या अंधाराला भिऊन

हळूच काढता पाय घेतात !
दरीचा दराराच मोठा
दरीचं मनही मोठं !
वादळ-वारा, आग-पाणी
दरी सारं झेलून घेते
आतली प्रजा
सुखात राहते !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2532
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## उद्यान !

लक्ष्मीपुत्राचा बंगला किती छान
त्याला लागूनच एक छोटेसे उद्यान !
भुसभुशीत माती तांबडी-काळी
रंगीत विटांच्या रेखीव ओळी
त्यात डोलती फुलझाडे
मोहक, देखणी, नाजूक
श्रीमंतांच्या मुलांसारखी !
मधूनमधून डेरेदार वृक्ष
फळांनी लहडलेले
सुखातिरेकाने तृप्त झालेल्या–
गर्भश्रीमंतांसारखे !
मांडवावरच्या वेली
त्यावर विविधरंगी फुलांची दाटी झाली
जणू नटूनथटून पार्टीत आलेल्या
धनिक ललना !
हिरवेगार रेखीव लॉन
नुसतं पाहून हरपते भान
पण–
असली उद्याने
दुरुनच दिसतात लुसलुशीत
तशी आतून ती

नुसती भुसभुशीत
बंगल्यातल्या माणसांसारखीच !
उद्यानातून फिरताना
सतत भास होतो
लावले आहेत इथे अदृश्य फलक
" हात लावू नका, रंग ओला आहे !"

## आटलेली नदी !

नदी आटून गेली
पाणी सुकून गेले !
उघडा-बोडका झालाय घाट
दोन्ही तिरांवर शुकशुकाट
पात्रात फक्त दगड-गोटे
आणि वाळूचे कण छोटे-छोटे
नदी आटून गेली
पाणी सुकून गेले !
काठावरच्या बोरीबाभळी
त्याही हसतात कुचेष्टेने
लाल धुळीचे गरम लोट
त्यांनी अंग माखून गेले
नदी आटून गेली
पाणी सुकून गेले !
आटलेल्या पाण्याबरोबर
साऱ्यांचे प्रेम आटून गेले
तप्त वाऱ्याच्या जळत्या झळा
त्यात सारे करपून गेले
नदी आटून गेली
पाणी सुकून गेले.

# पर्वत !

पूर्वी म्हणे पर्वतांना उडता यायचं
कधी-कधी खरं वाटतं मला ते !
पंख पसरून बसलेले
निळे पर्वत
मला शापित यक्षाप्रमाणे वाटतात !
पाय जमिनीत रुतले आहेत
पंखदेखील गुंतले आहेत
डोळे मिटून चाललंय त्यांचं तप !
अंगावर चढली आहेत मातीची पुटे
त्यावर उगवली आहेत झाडे-झुडपे
किलबिलतात पक्षी
झगडतात श्वापदे
ऊन, वारा, पाऊस...
येतात आणि जातात !
चांदण्यात ते शहारत नाहीत...
अंधारात उसासत नाहीत...
वादळातही निश्चल असतात...
जणू उःशापाच्या क्षणाचं–
स्वप्न पाहत बसतात !

## धुकं !

खंडाळ्याचा घाट, धुकं तिथं दाट
खोल खोल दरी, त्याने भरली काठोकाठ.

पावसाच्या सरी, वारा भिरीभिरी
त्याच्यामागे धुक्याची लाटेवर लाट.

डोळ्यापुढे धुके, आगेमागे धुके
दुपारची वेळ जणू वाटते पहाट.

मोटारींचे दिवे, वाटती काजवे
केली आज धुक्याने, यंत्रावर मात.

दिसेनासे झाले, डोंगर दरी सारे
आभाळाने टेकले जणू पृथ्वीवरी हात.

## विशाल सागरतीरावर....!

विशाल सागरतीरावर
माझं मन रमत नाही !
चिमुकल्या होडयांची शिडं पाहून
माझा जीव–
भितीच्या भोवऱ्यात सापडतो !
खडकावर आदळणाऱ्या लाटा पाहून
माझ्या आशा–
छिन्नभिन्न होतात !
लाल-गढूळ अथांग पाणी पाहून
माझ्या अस्तित्वाला
भोवळ येते !
काठावरची चरबरीत वाळू पाहून
माझ्या मुलायम भावनांचं–
नुसतं पोतेरं होतं !
बुडणारा सूर्याचा तांबडा गोळा पाहून
माझ्या स्वप्नांवर–
निराशेची काजळी पसरते !
म्हणून माझं आणि सागराचं
नातं जमत नाही !
विशाल सागरतीरावर
माझं मन रमत नाही !!

## बाभूळबन !

गावकुसाबाहेर
उजाड माळावर
विस्कटल्यासारखं उभं आहे
बभुळबन !
काळीसावळी
ओबडधोबड खोडं !
अर्धपोटी दलितांसारखी
निब्बर, चरबरीत !
केसांच्या झिपऱ्या पिंजारलेल्या–
दलित आयाबायांसारखे–
बाभळीच्या काटयांचे झाप !
कधीही तेलपाणी–
न मिळाल्यासारखे
रखरखीत !
या उपेक्षित वस्तीकडें
फिरकत नाहीत कधी
मोर, हंस, हरिणे...
इथं वस्ती असते
कावळयांची
आणि
काटयांवर पोटं भरणाऱ्या


शेळ्या मेंढयांची !
त्यांच्या कधी
महालमाडया बनत नाहीत
त्यांच्या नशिबी असते–
फक्त कुऱ्हाडीचे घाव
आणि चुलीतली आग !
उपेक्षा, उपहास घेऊन–
जन्माला आलंय बाभळीचं बन
म्हणूनच मला ते आपलंसं वाटतं
तिथंच रमतं माझं मन !

... अहालय ठाणे
ना. क्र. ...
... शाखा (स्थळ प्रत)

## अंकुर !

तहानलेली जमीन
टक लावून बसलेली
आभाळाकडे !
कुंद आभाळात
हलू लागले होते
ढग थोडे थोडे !
एक सर आली
जमीन भिजवून गेली
दुसरी सर आली
काहीतरी रुजवून गेली !
सकाळच्या किरणांना
एक कौतुक दिसले
तृणांकुरांचे एक गाव
त्यांच्याकडे पाहून हसले !
उगवून आले होते
लक्ष लक्ष अंकुर
सृजनाच्या गीताला
सापडला होता नवीन सूर !

REFBK-0024907
REFBK-0024907



मनोहर रणपिसे

लोणावळ्याजवळ 'वळक' या खेडेगावी दलित कुटुंबात जन्म. शिक्षण लोणावळ्याच्या गुरुकुल हायस्कूल व पुण्याच्या एम. ई. एस. कॉलेजमध्ये सरकारी नोकरी, मुंबईत वास्तव्य.

काव्यमय वृत्ती-संगीत, कला, साहित्यात अभिरुचि. १९७६ पासून वृत्तपत्रांत समस्याप्रधान लिखाण. १९८० साली 'मिनिस्ट्री ऑफ एज्यूकेशन अॅन्ड कल्चर' भारत सरकार यांजकडून 'बुद्ध-गीतांजली' प्रोजेक्टसाठी संशोधन शिष्यवृत्ती. आंतरराष्ट्रीय स्तरावर समजकार्य. जागतिक शांतता परिषदेस अमेरिकेस जाण्यासाठी सन्माननीय प्रतिनिधी म्हणून निवड.

मनोहर रणपिसे यांच्या आगामी साहित्यकृती. 'राजमार्ग'—दलित जीवन पद्धतीचा एका वेगळ्या जाणीवेतून परखड परामर्ष घेणारी निर्भिड कादंबरी. 'प्रश्नचिन्हांचा प्रवास'! –अमेरिकेच्या दौऱ्यातील अनुभवकथन करणारे अविस्मरणीय प्रवासवर्णन. दलित समाजाला पोखरून उध्वस्त करु पाहणाऱ्या दलितांतीलच संभावित गुन्हेगारांच्या दुष्कृत्यांचा पंचनामा करणारे ज्वालाग्राही नाटक— 'दलित!'

कव्हर : बॉम्बे सर्वोदय प्रेस, मुंबई १६.